# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 13/01/2023 (शुक्रवार) दुपार**


---

### दुखापत

**१) पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत हनुमान नगर इखार हाउस कन्हान येथे दिनांक १२/०१/२०२३ चे ०८.०० ते ०८.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. रेणुका सुनिल आगुटलेवार, वय ३५ वर्ष, रा. हनुमान नगर इखार हाउस कन्हान ही सकाळी आपले घराचे आंगण झाडत असता यातील आरोपी नामे— अनिल बालैया आगुटलेवार, वय ४५ वर्ष, रा. हनुमान नगर इखार हाउस कन्हान (फिर्यादीचा देर) हा बाहेरुन दारु पिवुन आला व फिर्यादीजवळ येवुन तिच्या कडे पाहुन शिवीगाळ करु लागला. फिर्यादीने आरोपीला हटकले की सकाळी सकाळी शिवीगाळ का करता शांत रहा माझा मुलगा झोपला आहे. यावरुन आरोपीने बाजुला पडलेली लाकडी काठीने फिर्यादीच्या डोक्यावर उजव्या हातावर मारुन जखमी केले तसेच जिवाने मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मेश्राम पोस्टे कन्हान मो. नं. ९०६७१७६६९४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०६ किमी अंतरावर भन्साळी टाकळी येथे दिनांक ११/०१/२०२३ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. मंगला नरतम मंगल ठाकुर, रा भन्साळी टाकळी सावनेर ही शेतातील धुऱ्याला बांधलेली म्हैस सोडुन कोठयात बांधण्याकरीता घेवुन जात असता यातील आरोपी नामे— सुर्यभान सरदार, रा. भन्साळी टाकळी सावनेर यांनी तु म्हैस कशाला ठेवली असे म्हणुन विकुन टाक असे म्हटले असता फिर्यादी ने त्यास ''तुझ्या जवळचे जनावरे तु का विकत नाही तु कशाला ठेवले'' असे म्हटल्याने नमुद आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळ करून हातातील लाकडी काठीने फिर्यादीच्या दोन्ही पायावर व उजव्या हातावर मारून जखमी केले व हातभुक्याने मारहाण करून पुन्हा जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ७७ पांडे मो. नं. ७९७२४३१२३८ हे करीत आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर